(ढ) " निरंतर वापर" याला जैविक विविधता अधिनियम, २००२ (२००३ चा १८) याचे कलम २, खंड (ण) मध्ये जो अर्थ नेमून दिला असेल, तोच अर्थ असेल;

(ण) "इतर पारंपारिक वननिवासी " याचा अर्थ १३ डिसेंबर, २००५ पूर्वी किमान तीन पिढयांपासून मुख्यत्वेकरुन वनात राहणारा आणि उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजांसाठी वनांवर किंवा वन जमिनींवर अवलंबून असणारा कोणताही सदस्य किंवा समाज, असा आहे.

स्पष्टीकरण - या खंडाच्या प्रयोजनार्थ "पिढी" या चा अर्थ पंचवीस वर्षांचा कालखंड असा आहे ;

(त) "ग्राम" याचा अर्थ,--

(एक) पंचायत तरतुदी (अनुसूचित क्षेत्रांपर्यंत विस्तार) अधिनियम, १९९६ (१९९६ चा ४०) याच्या कलम ४, खंड (ख) मध्ये निर्देशिलेले ग्राम, किंवा

(दोन) पंचायतीशी संबंधित कोणत्याही राज्य विधिमध्ये ग्राम म्हणून निर्देशाण्यात आलेले अनुसूचित क्षेत्रांव्यतिरिक्त कोणतेही क्षेत्र; किंवा

(तीन) वन ग्रामे, जुनी वस्ती किंवा वसाहती आणि भूमापन न केलेली ग्रामे, मग ती ग्राम म्हणून अधिसूचित करण्यात आलेली असोत अगर नसोत; किंवा

(चार) पंचायत नसेल, अशा राज्यांच्या बाबतीत कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे पारंपारिक ग्राम,

असा आहे;

(थ) "वन्य प्राणी" याचा अर्थ, वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५२) याच्या अनुसूची एक ते चार यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आणि निसर्गामध्ये वन्य स्वरूपात आढळणाऱ्या प्राण्यांच्या कोणत्याही प्रजाती, असा आहे.

## प्रकरण दोन

## वनहक्क

**वन निवासी अनुसूचित जमाती व इतर**

**३. (१)** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, सुरक्षित वैयक्तिक किंवा सामूहिक किंवा दोहोंचे धारणाधिकार म्हणून असेलेले पुढील हक्क वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचे वनहक्क

उपवनसंरक्षक
गोंदिया वनविभाग, गोंदिया